सोबत मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मनात आत्महत्येचा विचार येऊ नये याबाबत कार्यवाही करणेबाबतचे पत्र क्र. १०/एडीएम/विद्यार्थी समुपदेशन/२०२२/८९३ दिनांक २१/१०/२०२२ च्या परिपत्रकाची प्रत सोबत जोडलेली आहे. कृपया त्याचे अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

पृष्ठांकन क्र: तंशिविकाअ/शिक्षण/२०२२/ 2910
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दि. 10 NOV 2022

**प्रति,**

प्राचार्य, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, त्यांनी मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्रात दिलेल्या निर्देशाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करुन त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(श्री. एम. एम. अंधारे)
सहाय्यक संचालक (तां),
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना ई-मेल करण्यासाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : १०/एडीएम/विद्यार्थी समुपदेशन/२०२२/ ८९३ दिनांक : 21 OCT 2022

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे.

**विषय : संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मनात आत्महत्येचा विचार येऊ नये याबाबत कार्यवाही करणेबाबत**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, काही दिवसांमध्ये विद्यार्थ्यांची आत्महत्याबाबतची प्रकरणे महाविद्यालयांमध्ये आढळून आलेली आहेत. पुष्कळदा आत्यंतिक नैराश्यामुळे, मनात उद्भवलेल्या मानसिक अस्वस्थतेमुळे (उदा.वैफल्य, छिन्न मनस्थिती इत्यादी) तसेच परीक्षेच्या भितीमुळे विद्यार्थी आत्महत्येस प्रवृत्त होतात. तणाव, दुर्दैवाने वाट्याला आलेली आर्थिक संकटे, वैयक्तिक नातेसंबंधांतील गुंते यांचाही यात वाटा असू शकतो. अशा वेळी जर त्याला योग्य असे मानसिक पाठबळ, मार्गदर्शन मिळाले नाही, तर तो स्वतःला संपवण्याचा प्रयत्न करतो. आत्महत्या करणारी व्यक्ती परीक्षांमधील अपयश, पालकांच्या आणि स्वतःच्या अपेक्षा पूर्ण करता न येणे, विस्कळीत बालक-पालक नाते, स्वतःच्या स्वतःकडून असणाऱ्या अतिरेकी आणि अवास्तव अपेक्षा अशा वेगवेगळ्या कारणांमुळे प्रचंड तणावात असते. त्यातून ती व्यक्ती असे टोकाचे पाऊल उचलते, असे आढळून येत आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक संस्थांमध्ये शिकत असलेले असे विद्यार्थी त्यांच्या वागण्याबोलण्यातून ओळखून त्यांच्या मनात आत्महत्येचा विचार येऊ नये, याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. याकरिता संस्थेमध्ये ठराविक कालांतराने मानसशास्त्रज्ञांचे कार्यक्रम/शिबीर राबविणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांमधील शारीरिक, मानसिक आणि भावनिक संतुलन दृढ करणे, यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांचा स्वतःच्या क्षमतेवर असलेला विश्वास वाढविणे, विद्यार्थ्यांची एखाद्या समस्येचा/संकटाचा सामना करण्याची पद्धत जाणून घेऊन त्यांना मार्गदर्शन करणे यास्तव संस्थेमध्ये विविध व्याख्याने, शिबीरे, कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थी-शिक्षक दत्तक योजना (mentor-mentee) राबविण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांच्या चिंता, तणाव, परीक्षेची भीती, होमसिकनेस आणि इतर शैक्षणिक चिंता या समस्यांचे निराकरण करण्यासाठी अध्यापकांनी कौन्सिलिंग करण्याची गरज आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करुन आपण आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मनात आत्महत्येचा विचार येऊ नये, याकरीता संस्थांमध्ये वरीलप्रमाणे विविध उपक्रम वर्षभर राबविण्याचे नियोजन करुन हे उपक्रम यशस्वीपणे राबविण्याबाबत संस्थांना कळविण्यात यावे. याबाबत आपल्या अधिनस्त असलेल्या संस्थांनी केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अहवाल आपल्या अभिप्रायासह दर दोन महिन्यांनी या संचालनालयास सादर करावा.

शैक्षणिक विभाग
8/11

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : कार्यासन क्र.२, २अ, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.